दै लोकमत (1)

# मतदार यादीचं काम वेगात

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादीचे काम वेगात सुरु असून राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेने नियुक्त केलेल्या मास्टर ट्रेनर अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले.

मतदार यादीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन टू वोटर मोबाईल अॅपमार्फत प्रत्येक सेक्शन अॅड्रेसवर जाऊन कंट्रोल चार्ट तयार करुन कार्यालयाकडे पाठवणे. तसेच संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून मतदार यादीच्या पीडीएफ फाईल तयार करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने आयोगाचे प्रतिनिधी मुरलीधर भुतडा यांनी मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणांतर्गत उपरोक्त मोबाईल अॅप लोड करुन त्यामध्ये विविध मॉड्युल हाताळणे, त्यामध्ये माहिती भरणे आदींचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास सहाय्यक आयुक्त निवडणूक व संगणक विभागातील कर्मचारी उपस्थित होते.